**प्रेसनोट दि. ११.०७.२०२२**

पलुस पोलीस ठाणे, जि. सांगली गु.र.नं. २४८/२०२२, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम. ७ अ, १२ प्रमाणे. दाखल गुन्ह्याचे तपासामध्ये लोकसेवक शंकर जगन्नाथ कुटे, वय ४७ वर्ष पोलीस हवालदार नेम. पलुस पोलीस ठाणे रा. झुंजार चौक,उरुण इस्लामपुर ता वाळवा, जि. सांगली. यांचा गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्ह्याचे तपास कामी अटक केली आहे.लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगलीची कारवाई.

---

पलूस पोलीस ठाणे येथे फसवणुकीच्या गुन्ह्यात अटकेत असलेले तक्रारदार यांचे भाऊ यांना गुन्ह्यात सहकार्य करणे करीता व त्यांचेवर आणखीन गुन्हे दाखल करु नये याकरीता खाजगी इसम समीर शमशुद्दीन मुल्ला यांने तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रूपयेची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १९.०६.२०२२ रोजी व दि.२०.०६.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये खाजगी इसम समीर शमशुद्दीन मुल्ला यांनी तक्रारदार यांच्याकडे पोलीस अधीकारी यांना सांगुन मदत करतो असे म्हणुन १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन चर्चेअंती ८०,०००/- रूपये पोलीस अधीकारी यांचेकरीता लाचेची मागणी केली व लाच रक्कम घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले होते.

त्यानंतर दि.२१.०६.२०२२ रोजी पलूस येथील नवीन एस.टी. स्टॅण्ड जवळ सापळा लावला असता खाजगी इसम समीर शमशुद्दीन मुल्ला यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ८०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच खाजगी इसम सचिन संपत औटे यांनी आरोपी क्र १ यांना याकामी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले होते.

तक्रारदार यांनी दिले फिर्यादी वरुन खाजगी इसम (१) समिर शमशुद्दीन मुल्ला, वय ४३ वर्षे, व्यवसाय - पेंटींग (मजुरी) रा. स्काय लाईन बिल्डींग इंगळेकर हॉस्पीटल जवळ पलुस (२) सचिन संपत औटे, वय ४० वर्षे, व्यवसाय - शेती रा. शिवाजी चौक कुंडल ता.पलूस जि. सांगली याचे विरूध्द पलुस पोलीस ठाणे गुरनं.२४८/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अ व १२ प्रमाणे दि. २२.०६.२०२२ रोजी ०९.४७ वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये यातील आरोपी क्र.२ सचिन संपत औटे यांना पलुस पोलीस ठाणेमध्ये नेमणूकीस असलेले लोकसेवक शंकर जगन्नाथ कुटे, वय ४७ वर्ष पोलीस हवालदार यांनी लाच मागणी व लाच स्विकृतीमध्ये प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने लोकसेवक शंकर जगन्नाथ कुटे, वय ४७ वर्ष पोलीस हवालदार नेम. पलुस पोलीस ठाणे रा. झुंजार चौक,उरुण इस्लामपुर ता वाळवा, जि. सांगली. यांना गुन्ह्याचे तपास कामी आज दि.११.०७.२०२२ रोजी अटक केले असून मा.न्यायालयाने त्यांची दि.१२.०७.२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुरज गुरव अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली हे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner